पुण्यात अजित पवारांची प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांसह बैठक >>पान 2

मत घेण्यासाठी एक रुपयात विमा आता मात्र, तुमचं तुम्ही बघा अशी सरकारची भूमिका >>पान 3

सर्व गुंड बुलढाण्यात बसलेत की काय असा संशय आहे >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ



'डॉन'चे दिग्दर्शक चंद्रा बारोट यांचं निधन; मनोरंजन विश्वावर शोककळा

आतील पान

**सुविचार**

प्रत्येक दिवशी नवीन काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करा.

apalavidarbhlivenews@gmail.com   मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 02 ■ सोमवार, दि. 21 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# अमित शाहांनी मंत्र्यांना डच्चू देण्याचं ठरवलंय त्यात कोकाटेंच देखील नाव ; संजय राऊत यांचा खळबळजनक विधान

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी : कृषिमंत्री माणिकराव कोकाटेला शेतकऱ्यांना भेटायला वेळ नाही.गेल्या काही काळापासून कृषिमंत्र्याची विधाने सगळ्यांना पहिले आहे. अशा आमदारांना कृषी मंत्रीपद देऊन सरकारने महाराष्ट्राला कोणते योगदान दिले?असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोणाचे व्हिडिओ पैशाच्या पेटी बरोबर तर कोणाचे व्हिडिओ खेळताना तर कोण चड्डी बनियान वर मारामारी करतात ही महाराष्ट्राची परिस्थिती आहे.अमित शहा यांनी चार मंत्र्यांना डच्चू देण्याचे सुचवले आहे. त्या यादीत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे देखील नाव आहे.असे खळबळजनक विधान खा.संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना केले.**



यावेळी खा. संजय राऊत म्हणाले की,अमित शहाणे चार ते पाच मंत्र्यांना वगळण्याच्या सुचना मुख्यमंत्र्यांना केल्या आहेत. एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे देखील दिले आहेत. ज्यात कृषिमंत्रीच देखील नाव आहे. याची मला पक्की माहिती आहे. केंद्रातील सरकार ढोंगी सरकार आहे. छत्तीसगड मध्ये अनेक राजकीय नेत्यांवरती कारवाई झाली आहे. त्यात काँग्रेस माजी मुख्यमंत्री आणि त्यांच्या चिरंजीवला देखील अटक केली आहे. मात्र, अशाच प्रकारचे गुन्हे महाराष्ट्राचे राजकारणी आणि सत्ताधारी करत आहेत. ऑनलाइन गेमिंग मध्ये त्यांची गुंतवणूक आहे. मात्र, त्याच्यावरती ईडीची कारवाई केली गेली नाही. छत्तीसगडमध्ये जी कारवाई केली इकडे करत नाहीत.हा दुटप्पीपणा आहे. शिवसेना पक्षप्रमुख ने अशा प्रकारचे संकेत दिले तर तो त्यांचा प्रश्न, त्यासाठी कुणाला प्रॉब्लेम आहेत का? त्यांना त्यांचा प्रश्न मुलाखतीत विचारला आहे.ठाकरे एकत्र आले कोणाला काही प्रॉब्लेम आहे का तुम्हाला समस्या आहेत का, पोटसूळ आहे. का माझा देखील तोच प्रश्न आहे. राज ठाकरे यांनी मिरा-भाईंदरच्या सभेत सकारात्मक वक्तव्य केले. उद्धव ठाकरेंनी आज वक्तव्य केले. याच्यावरती फार चर्चा न करता भविष्यात ज्या घडामोडी घडतात त्याकडे लक्ष ठेवलं पाहिजे. एनसीपी एकत्र येण्यासाठी अमित शहा यांना विचारायला पाहिजे. त्यांचा पक्ष आणि शिंदे पक्ष यांचे प्रमुख अमित शहा आहेत.दोन्ही पक्षांना अमित शहाणी जन्म दिला आहे. पहलगाम आणि ऑपरेशन सिंदूर संदर्भात ट्रम्पच्या यांची भुमिका त्यांच्या मोदींवरील दबावमुळे युद्ध थांबलं, या विषयावर आम्ही प्रश्न विचारात अमित शहा यांचा राजीनामा मागणार आहोत.घटना घडली देशाच्या अंतर्गत सुरक्षेबाबत सुरक्षेच आव्हान आहे. पुलवामा सारखे हल्ले होत आहेत. रोज हत्या होतात ही देशातल्या अंतर्गत सुरक्षेतील सगळ्यात मोठी चूक आहे.अशा परिस्थितीत गृहमंत्री यांच्या खुर्चीवर बसून राजकारण करत कसे बसू शकतात.ऑपरेशन सिंदूर मधील स्त्रियांचं सिंदूर पुसण्यामध्ये अमित शाह जबाबदार त्यामुळे त्यांच्या राजीनामा मागाव लागेल.असे मतही यावेळी त्यांनी व्यक्त केले.राज्यात एक मंत्री टॉवेलवर मारामारी करतो. दुसरा मंत्री सिगरेट मारत बन्यांवर पैशाची बॅग दाखवतो की आम्ही किती पैसे लुटमार केली आहे. एक मंत्री राज्य गृहमंत्री पदाच्या कार्यावरून त्याच्या मालकीच्या बारमध्ये मुली नाचतात पैसे उधळले जातात. हे मंत्री दुसऱ्याच्या बार वर जाऊन धाडी टाकतात आणि दहशत निर्माण करतात. मात्र, स्वतःच्या बारमध्ये काय चाललंय हे सरकारने उघडे केलं. या पद्धतीने त्यांच्या बार वर धार पडली याचा अर्थ सरकारनेच ती धाड यांच्या मंत्र्यांवरती टाकलेली आहे. कोणतरी अतिरिक्त शक्ती शिंदे यांच्या मंत्र्यांचे सर्व खेळ बाहेर काढण्यासाठी किती मेहनतीने काम करत आहे, हे महाराष्ट्राला कळलेले आहे.अशी माहिती माध्यमांशी बोलताना खासदार संजय राऊत यांनी दिली.

## संजय राऊत पाकिस्तानची भाषा बोलतात : खासदार नरेश मस्के यांची टिका

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** संजय राऊत पाकिस्तानचे हस्तक असून आज संजय राऊत पाकिस्तानची भाषा बोलतात. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अमित शहा आणि नरेंद्र मोदी यांच्या विरुद्ध बोलण्याचे कारण मुस्लिमांची मते एकत्र पडावी. याकरिता समाजाला खुश करण्यासाठी त्यांचे वक्तव्य आहे.अशी टिका खासदार नरेश मस्के यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, देशात राजकारण न करता, आपले सैनिकावर विश्वास ठेवला पाहिजे. मात्र, त्यांच्यावर विश्वास न ठेवता जी भाषा पाकिस्तान बोलते. आज ते संजय राऊत बोलत आहेत. ते पाकिस्तानचे हस्तक आहेत. हे सरळ दिसून येते. मुस्लिम हे देशावर प्रेम करतात. संजय राऊत यांचा भ्रमनिराश होणार आहे. अशी चुकीची वक्तव्य केले तरी मुस्लिम समाज यांना वोटिंग करणार नाही. राजकारण बाजुला ठेवून काम करा, आणि देशावर प्रेम करा. देशावर कोणाचेही सरकार असले, तरी, सैन्यावर प्रेम करून राजकारण न करता सैन्याच्यापाठी उभे रहा. यापूर्वी असे कोणी केले नव्हते, तुम्ही हे करू नका.एवढी वाईट परिस्थिती आली आहे की, ज्यांना बाळासाहेब यांचे नाव लावू नका, म्हणून फर्मान काढायला लावले. आज त्यांच्याकडे युती करता याचना होत आहेत. यापेक्षा जास्त दुर्दैव उद्धव ठाकरे यांचे काय होऊ शकते.

विकतचा सल्ला घेण्याकरिता ठाकरे कडे कोणी नाही, म्हणून फुकट सल्ला ते देत आहेत. जुगाराबाबत मंत्री कोकाटे यांनाच विचारा असे मत यावेळी खासदार नरेश मस्के यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## पहाटे वाचवा वाचवा म्हणत ओरडत होती महिला, पतीचा कांड पाहून गावकरी हादरले, जळगावातील खळबळजनक घटना!

**पाचोरा/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्याच्या पाचोरा तालुक्यात एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. इथे एका व्यक्तीने आपल्या पत्नीची निर्घृण हत्या केली आहे. आरोपी पतीने धारदार चाकुने गळा चिरून हत्या केली. भल्या पहाटे हत्येची घटना घडल्याने संपूर्ण गाव हादरलं आहे. या प्रकरणी आरोपी पतीवर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस घटनेचा सविस्तर तपास करत आहेत.

प्रियंका खुशाल भदाणे असे हत्या झालेल्या विवाहित महिलेचे नाव आहे. तर खुशाल भदाणे असे आरोपी पतीचे नाव आहे. खुशाल याने चारित्र्याच्या संशयातून ही हत्या केली असावी, असा संशय पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मात्र अद्याप पोलिसांनी हत्येच्या कारणाची पुष्टी केली नाही. तपास सुरू आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना जळगाव जिल्ह्याच्या पाचोरा तालुक्यातील जारगाव याठिकाणी घडली. खुशाल भदाणे या तरुणाने कौटुंबिक वादातून आपल्या पत्नी प्रियंका भदाणे हिची चाकूने गळा चिरून आणि पोटात वार करून निर्घृण हत्या केली. प्रियंका हिचा जागीच मृत्यू झाला. ही घटना आज पहाटे घडली. ही घटना घडत असताना प्रियंका ''मला वाचवा, मला वाचवा'' असा आरडाओरडा करत होती. आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पतीचा कांड पाहून गावकरी हादरले.

## वाढलेल्या वेलींमुळे अपघाताला निमंत्रण; अखेरीस महावितरणने मोहीम राबवली

**अमरावती/प्रतिनिधी :** अनेक भागात वीज वाहिन्यांना वृक्षांच्या फांद्या अडथळा ठरतात. यामुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होतो असा पूर्वानुभव आहे. दुसरीकडे पावसाळ्यात वीज तारा, रोहित्रांवर वाढणाऱ्या वेलींचा प्रश्न गंभीर बनतो.

पावसाळ्यात वीज खांबावर व रोहीत्रावर चढणाऱ्या वेलीचे प्रमाणही जास्त असते. त्यामुळे अखंडित वीज पुरवठ्याला अडथळा ठरणाऱ्या व प्रसंगी अपघातालाही निमंत्रण देणाऱ्या वेली व झाडे-झुडूपे काढण्याची मोर्शी विभागाने मोहीम हाती घेत एकाच दिवशी ५९३ वीज खांब व वाहिन्यावरील आणि १४२ रोहित्रावरील वेली काढण्यात आल्या.

महावितरणची वीज वितरण व्यवस्था उघड्यावरच आणि वना-रानात अशी सर्वदूर पसरली असल्याने अनेक ठिकाणीची रोहीत्रे आणि वीज खांबे ही वेली तसेच झुडूपे यांच्या विळख्यात वारंवार अडकतात आणि वीज यंत्रणा असुरक्षित करतात. परिणामी, थोडी जरी हवा आली तरी खंडित वीज पुरवठ्याला सामोरे जावे लागते, शिवाय वेली व झुडूपे ही ओली असल्यामुळे यात व खांबाला लावलेल्या टेन्शन तारांमध्ये वीज प्रवाह उतरण्याची शक्यता अधिक असते.

# शेतकऱ्यांप्रती कृषी मंत्र्याचा असंवेदनशीलपना

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांची कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर टीका

दैनिक आपला विदर्भ





**डोणगाव/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकरी नैसर्गिक संकटाने हवालदिल झालेला असताना कृषी मंत्री मात्र, मोबाईलवर रमीचा डाव खेळत आहेत.ही बाब राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाजिरवाणी आहे. राज्यातील शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटात आहे. अनेक समस्यांना तोंड देत शेतकरी प्रत्येक दिवस काढत असताना सरकार मायबाप म्हणून भूमिका निभवणाऱ्या कृषी मंत्र्यांनी शेतकऱ्यांना ठोस मदत करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जात त्यांना भेट देण्याची गरज असताना राज्याचे कृषिमंत्री मात्र मंत्रालयात रमीचा डाव खेळत आहे. हा प्रकार कृषी प्रधान देशातील व राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाजिरवाणा असून नैतिक जबाबदारी स्वीकारून कृषी मंत्री पदाचा राजीनामा द्यावा व खुशाल रमी खेळत बसावे,असे मत बुलढाणा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी व्यक्त केले.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे मोबाईलवर रमी खेळत असतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.या व्हिडिओवरून संपूर्ण राज्यात त्यांच्यावर टीका होत आहे.एकीकडे एका दाण्याचे हजार दाणे करणारा शेतकरी आसमानी व सुलतानी संकटाने हतबल झाला आहे.जून महिन्यातील शेवटच्या हप्त्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे जीवन जगणे कठीण झाले आहे. पेरणी केलेले बियाणे अतिवृष्टीत वाहून गेले आहे. तर, हजारो हेक्टर जमिन खरडून जाऊ जमिनीला वाळवंटाचे स्वरूप आले आहे. त्यामुळे या वर्षीच नव्हे तर, पुढील पाच दहा वर्षे ही शेतकऱ्यांना त्या जमिनीमध्ये उत्पादन घेणे शक्य नाही. काही शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली आहे.भाजप सेनेचे सरकार सत्तेत आल्यापासून शेतमालाला भाव नाही. महागाई प्रचंड वाढलेली आहे. त्या तुलनेत शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा मोबदला मिळत नाही. अशा अनेक संकटात शेतकरी अडकला असताना मायबाप शासनाने शेतकऱ्यांना ठोस निधी उपलब्ध करून देत आर्थिक मदत करण्याची गरज आहे. मात्र, शासन शेतकऱ्यांवरती ब्रश शब्दही बोलायला तयार नाही. निवडणूक काळात दिलेले कर्जमाफीच्या आश्वासने हवेत विरले आहे. शेतकरी कर्जमाफीची व अतिवृष्टीची मदत देण्याची मागणी करत असताना शेतकऱ्यांचे असू पुसणे ऐवजी निर्दयी कृषिमंत्री मोबाईलवर रमी चा खेळ खेळत आहेत.ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाजीरवांनी बाब असून अशा निष्ठूर कृषिमंत्र्याला पदावर राहण्याचा अधिकार नाही. त्यामुळे कृषी मंत्री कोकाटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊ घरी खुशाल रमी खेळत बसावे, अशी टीका बुलढाणा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी करून कृषी मत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.

## विधानसभेत बसून रमी खेळण्याचे कोणी समर्थन करणार नाही - मंत्री गिरीश महाजन

**पंढरपूर/प्रतिनिधी :** आमदार रोहित पवार यांच्या व्हिडिओ पाहला आहे. विधानसभेत बसून रमी खेळण्याचे कोणी समर्थन करणार नाही. अशी प्रतिक्रिया मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



यावेळी ते म्हणाले की, मुख्यमंत्री आणि आदित्य ठाकरे यांची कुठलीही भेट झाली नाही. ते वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी हॉटेलमध्ये होते. एकमेकांकडे रागाने बघण्यापेक्षा विधिमंडळात हास्यविनोद झाला हे चांगलेच आहे. संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांची मुलाखत लोक गमतीचा भाग म्हणून पाहतात.अशी कोपरखळीही त्यांनी यावेळी मारली. बाळासाहेब ठाकरे गेल्यावरच ठाकरे ब्रँड संपला. भाजपला सोडून काँग्रेसच्या मांडीवर बसले तेव्हाच ठाकरे बँड संपला. विरोधी पक्षातील खास करून उबाठा मधील ७ ते ८ खासदार मनाने आपल्या सोबत आहेत. कायदेशीर अडचणी असल्यामुळे पक्षप्रवेश होऊ शकत नाही.

महाविकास आघाडी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकत्र राहू शकत नाही.पोलिसांवर अरेरावी कोण करत असेल, तर त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. नाशिकच्या पालकमंत्री पदासाठी विठ्ठलाला साकडे घालतो आहे. मंत्री गिरीश महाजन यांचे हास्य विनोदात विधान मात्र नंतर आपण देवाकडे साकडे घालत नाही. मात्र काम करतोय.पालकमंत्री नसलो, तरी नाशिक कुंभमेळ्याची जबाबदारी आपल्याकडेच आहे. अशी माहिती यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

# कृषिमंत्र्यांना घरी बसवायला हवे - विरोधी पक्षनेते अंबादास दानवे पत्रकार परिषदेत मागणी

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** राज्यात दुबार पेरणीचे संकट आहे. बी बियाणे वाया गेले. मात्र, कृषिमंत्री सभागृहात रमी खेळत असल्याचे दिसले. त्यांनी घरी खेळावे, शेतकरी परेशान आहेत आणि हे मंत्री असंवेदनशील दिसत आहेत. मंत्री मोबाईल वर खेळत दिसतात दुर्दैव आहे. ही पहिली घटना नाही. कधी ओसाड गावची पाटीलकी म्हणतात, काहीही बोलतात. त्यांच्यावर कारवाई व्हावी, त्यांना घरी बसवावे अशी आमची मागणी आहे. यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही.असे मत पत्रकार परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त करून कृषिमंत्र्यांनी राजीनामा देण्याची मागणी केली. यावेळी ते म्हणाले की, कर्जमाफी बाबत बच्चू कडू आंदोलन करत आहेत.मात्र,सत्तेवर असताना त्यांनी काय केले, सरकारने कर्जमाफी आश्वासन दिले आहे. बच्चू कडू करत आहेत. म्हणून आम्ही करावे,असे काही नाही. शेतकरी व्यस्त आहेत. त्यामुळे हा योग्य कालावधी नाही. आदित्य ठाकरे आणि मुख्यमंत्री एखाद्या हॉटेलमध्ये लकिली पोहोचने म्हणजे



भेट झाली, असे होत नाही.त्यांना संदिग्ध भेटण्याची गरज नाही. संत असलेले प्रताप सरनाईक यांची ईडीची चौकशी सुरु आहे. शिवसैनिकाने काय करावे, मी ठरवले तरी त्याला दिशा देण्याचे काम पक्षप्रमुख ठरवतील. पुन्हा निवडणुकीच्या माध्यमातून जाणार. मी स्वतः परत लढणार. भाजप - शिवसेना एकत्र आम्ही भाजपला उघडपणे भेटलो. आम्ही दुष्मन नाही, विरोधक आहोत. विचारांची लढाई आहे, आमच्यात काही सुरू आहे असं वाटत नाही. महानगरपालिका आणि विधानसभा वेगळं आहे. विधानसभेत आधी जागावाटप करावे लागते, महापालिका वार्ड छोटे असतात. मनाला वेदना होतात, रक्ताने जोडलेले लोक विरोधात गेल्याने वेदना होतात. शिंदेंनाही काहीतरी नक्की वाटत असावे. शिंदे सोबत आल्याने त्यांना गद्दार म्हणणार का? छत्रपती शिवाजी महाराजांनी नेताजी पालकरला शुद्धीकरण करून घेतलं होते. यावर मी एवढंच बोलेन.ते असो की शिंदे हे सगळे शहा सेना आहेत, यांना पाणी प्यायचे असेल तरी विचारावे लागते. अशी टिकाही यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना सत्ताधाऱ्यांवर केली.

## निसर्गाची अवकृपा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाच्या लहरीपणा वाढत चालला आहे निसर्गाचा लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा ना जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उद्भवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसर्गाची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसर्गातील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वार्थामुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

# पुण्यात अजित पवारांची प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांसह बैठक

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवारांची पुणे येथे प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांसह बैठक पार पडली. सदर बैठकीला जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त यांची उपस्थिती होती. दोन-तीन महत्त्वाच्या विषयांवर बैठका झाल्या असल्याची माहिती यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी माध्यमांशी बोलताना माहिती दिली की, पुणे चॅलेंज ग्रँड टूर २०२६ आयोजित करणार आहोत. ४० ते ५० देशातील सायकलपटू सहभागी होणार आहेत. ४ स्टेजमध्ये स्पर्धा पार पडणार आहे. शनिवार-रविवारी पुणे- पिंपरी चिंचवड, पवना, सासवड, बारामती याच्यावर ठिकाणी आयोजन करण्यात येणार आहे. कोणत्या विभागाने




कुठली जबाबदारी पार पाडायची यावर चर्चा झाली आहे.सरकार म्हणून आमच्याकडून पूर्ण मदत होईल. असेही यावेळी पवार यांनी सांगितले. पर्यटन वाढवण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. गेल्या रविवारी हिंजवडी मधले काही स्पॉट पाहिले होते, त्याचा पुढे काय काय झाले, यावरही चर्चा करण्यात आली. कासारसाई वरून निघणाऱ्या कॅनॉलवर रस्ता करण्याबद्दल आढावा घेतला आहे.किती पाऊस होतो, कोणत्या ओढ्यात किती पाणी येते, लांबी-रूंदी किती आहे. कोणत्या ओढ्यावर बिल्डिंग आहेत. याविषयीचा सर्वे करायला टंडनला सांगितले आहे. सर्व काम वेळेत करण्याचा मानस आहे. हिंजवडी आणि बऱ्याच रस्त्यांचे प्रश्न लवकरच निकाली निघणार आहेत. रस्ता करत असताना भाजी मंडई आणि इतर आरक्षित गोष्टींसाठीही जागा देण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी तयार केली आहे. त्याचबरोबर सचिवांच्या अध्यक्षतेखाली कमिटी करण्यात आली आहे. पुण्यातील वापर करण्याची क्षमता संपलेले धोकादायक पूल पाडण्याच्या सुचना दिल्या आहेत.काही पूल दुरुस्त करून पुन्हा वापरात आणता येऊ शकतात, त्यासाठी निधी देणार येणार आहे. पोलिसांवर सामान्य नागरिक हात उचलत असतील, तर, पोलिसी हिसका दाखवला जातो.त्यामुळे गुन्हेगारांच्या बाबतीतही अशा गोष्टी घडणार नाहीत,याच्या काळजी घेतली जाईल.आरोपी पकडल्यानंतर त्याच्या जवळचे साहित्य काढून घेतले जाईल, तशा सुचना पोलीस अधीक्षक आणि पोलीस आयुक्तांना दिल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनेचे, कायद्याचे भान ठेवून सुसंस्कृत महाराष्ट्राची परंपरा आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांनी दिलेली शिकवण आपण कृतीत उतरवली पाहिजे.काही लोकप्रतिनिधी चुकीचं वागले तर, सगळ्यांनाच नाव ठेवली जातात.असे मतही यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## 'डॉन'चे दिग्दर्शक चंद्रा बारोट यांचं निधन; मनोरंजन विश्वावर शोककळा

**मुंबई/प्रतिनिधी :** डॉन या चित्रपटाने हिंदी चित्रपटसृष्टीतील फिल्ममेकिंगला वेगळं वळण लावलं. त्याकाळी हा चित्रपट न्यू एज चित्रपट समजला गेला होता आणि त्याचं श्रेय अमिताभ बच्चन सोबतच या चित्रपटाचे दिग्दर्शक चंद्रा बारोट यांना देण्यात आलं होतं. याच चंद्रा बारोट यांनी वयाच्या ८६व्या वर्षी मुंबईतील वांद्रे येथील रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. गेल्या सात वर्षांपासून फुफ्फुसाच्या विकाराने ते त्रस्त होते. त्यांच्या निधनाची माहिती त्यांच्या पत्नी दीपा बारोट यांनी दिली.

डॉन चित्रपटाचे दिग्दर्शक : चंद्रा बारोट यांनी १९७८ साली प्रदर्शित झालेल्या डॉन या चित्रपटाने बॉलिवूडमध्ये एक नवीन ट्रेंड निर्माण केला. हा चित्रपट अमिताभ बच्चन यांच्या दुहेरी भूमिकेमुळं आणि वेगळ्या शैलीतील कथा आणि गीतामुळं आजही चर्चेत आहे. डॉन हा बारोट यांचा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट होता. पहिल्या प्रदर्शनावेळी हा चित्रपट फारसा चालला नाही, मात्र, खायके पान बनारस वाला हे गाणे प्रचंड गाजलं आणि नंतर डॉनने सुपरहिट स्टेटस मिळवत बॉलिवूडच्या इतिहासात आपला ठसा उमठवला.

सहाय्यक दिग्दर्शक म्हणून केलं काम : चंद्रा बारोट यांनी दिग्दर्शनाच्या क्षेत्रात येण्यापूर्वी मनोज कुमार यांचा सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केलं होतं. मनोज कुमार यांच्या रोटी कापड और मकान च्या वेळी बारोट त्यांचे असिस्टंट होते आणि चित्रपटाचे सिनेमॅटोग्राफर होते दिवंगत नरिमन इराणी. नरिमन ईराणी हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत प्रतिभावान छायाचित्रकार होते. त्यांनी जंजीर, डॉन यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांचे छायाचित्रण केलं. त्यांच्या कॅमेऱ्याची शैली नेहमीच वास्तवदर्शी आणि प्रभावी असायची.

इराणी यांना अशी दिली श्रद्धांजली : त्या सुमारास नरिमन इराणी, ज्यांना निर्मितीक्षेत्रात उतरायचे होते, त्यांना चंद्रा बारोट यांनी डॉन ची कहाणी ऐकविली आणि डॉन बनविण्याचे ठरविले गेले. यात अमिताभ बच्चन यांचा डबल रोल होता. परंतु सिनेमा पूर्ण व्हायच्या आधीच नरिमन इराणी यांचं अपघाती निधन झालं. चित्रपटाची सूत्रे त्यांची पत्नी सलमा इराणी यांच्याकडं आली. इराणी यांना श्रद्धांजली म्हणून अमिताभ सकट जवळपास सर्वांनी उर्वरित पैसे न घेता चित्रपट पूर्ण केला.

कलाकार आणि दिग्दर्शकांनी वाहिली श्रद्धांजली : डॉननंतर बारोट यांनी आश्रिता, हम बाजा बजा देंगे, प्यार भरा दिल यांसारखे चित्रपट दिग्दर्शित केले, पण डॉनइतकी लोकप्रियता अन्य कोणत्याच चित्रपटांना मिळू शकली नाही. त्यांच्या निधनानंतर बॉलिवूडमधील अनेक कलाकार आणि दिग्दर्शकांनी श्रद्धांजली वाहिली आहे. दिग्दर्शक फरहान अख्तर यांनी ओरिजिनल डॉनचे दिग्दर्शक गेल्याबद्दल शोक व्यक्त केला.

# भारतातील विविध भूमापन पद्धती

भारतातील जमिनींची मोजणी १० एप्रिल १८०२ रोजी सुरू झाली. त्यामुळे हा दिवस राष्ट्रीय भूमापन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त भारतातील विविध भूमापन पद्धतींवर नगर भूमापन अधिकारी श्री. किरण कांगणे यांनी टाकलेला प्रकाशझोतष्ठ

आपल्याला कधीतरी हे प्रश्न पडले असतील की, गुंठा म्हणजे काय? जमीन मोजणीची गुंटूर पद्धत म्हणजे काय? माऊंट एव्हरेस्ट या जगातील सर्वात उंच शिखराचे एव्हरेस्ट नाव कशामुळे पडले? पूर्वी मोजणी व शेतसारा कर पद्धत कशी होती ? त्यावेळी गुंटूर नावाचा ब्रिटिश अधिकारी होता. त्याने ३३ गुणिले ३३ अशी जमीन मोजणीची नवी पद्धत रूढ केली. त्यामुळे त्याचे स्मरण म्हणून या क्षेत्रफळाच्या जमिनीला १ गुंठा असे नाव पडले व त्या मोजणीला गुंटूर पद्धत असे म्हणू लागले.

जमीन मोजणीच्या सुरूवातीच्या काळात जॉर्ज एव्हरेस्ट नावाचा अधिकारी होता. त्याने कन्याकुमारी ते काश्मीर हे अंतर मोजले. तसेच जगातील सर्वोच्च शिखराची उंची मोजली. त्यात त्याला अतोनात परिश्रम झाले व त्यातच त्याचे निधन झाले. त्याचीच आठवण म्हणून जगातील सर्वोच्च उंच शिखराला त्याचे नाव देण्यात आले.

राज्यकारभार चालविण्यासाठी जमिनीच्या एकूण उत्पन्नापैकी काही अंश कर म्हणुन घेण्याची पद्धत पुरातन काळापासून आहे. भारतामध्ये इ.स. पूर्वीच्या राजवटीमध्ये जमीन महसूलाची निश्चित पद्धत होती. भारतात जमिनीचे सर्वेक्षण व नकाशे तयार करण्याची प्राचीन परंपरा आहे. मनुस्मृती व ब्रह्मांडपुराणातही त्याचा उल्लेख आढळतो. भारतीय इतिहासात सिंधु संस्कृतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याकाळाची नियोजनबद्ध संरचना मोहेंजोदडो व हडप्पा येथील उत्खननात मिळालेल्या अवशेषात दिसून येते. शंखापासून बनविलेल्या कोनमापक यंत्राचा व ओळंब्याचा वापर माणसाने त्याकाळी केला आहे.

मौर्य साम्राज्यामध्ये जमिनीची मोजणी व नोंदणी ठेवण्यासाठी फ्रज्जूकङ्ग नावाचा अधिकारी नेमला जाई. जमीन मोजणीसाठी दोरीचा प्रथम वापर केला गेला. मौर्यांच्या काळात संस्कृतमधील फ्रज्जूङ्ग यावरून फ्रज्जूकङ्ग हा शब्द प्रचलित झाला. कौटिल्याच्या म्हणजेच आर्य चाणक्याच्या अर्थशास्त्रामध्ये जमिनीची मोजणी, प्रतवारी, सर्वेक्षण करून तिचे कोरडी, बागायत, ओलसर अशा प्रकारे प्रतवारी करून जमिनीचा प्रकार, सिंचन सुविधा व त्यावरील पिकांच्या आधारे तिच्यावरील कराची निश्चिती केली जात असे.

जमिनीची मालकी व कर रचना असणारी महसूल पद्धत दिल्लीचा बादशहा शेरशहाने इ.स.१५४० ते १५४५ दरम्यान अवलंबली. त्याच्या कारकिर्दीमध्ये प्रत्येक जमीनधारकाची तसेच प्रत्येक हंगामातील प्रत्येक पिकाची नोंद करण्यात आली. हा महसूल काटेकोरपणे गोळा केला जाई. जमीनधारकाचे हक्क व त्याची जबाबदारी याचा स्पष्ट उल्लेख या करारनाम्यात मोगल बादशहा अकबराने त्याचा मंत्री तोरडमल याच्या मदतीने कर पद्धतीची फेर उभारणी केली. त्याने जमीन मोजणीसाठी प्रथमच काठी व साखळीचा वापर केला. क्षेत्रफळासाठी बिघा हे परिमाण ठरविण्यात आले व जमिनीची उत्तम, मध्यम व निकस या तीन प्रकारे विभागणी करण्यात आली.

जमिनीच्या एकूण उत्पन्नापैकी १३ हिस्सा कर म्हणून घेतला जाई. त्याचे चलनामध्ये मूल्यांकन करून मागील १९ वर्षांच्या सरासरी इतके पुढील १० वर्षांसाठी करपात्र उत्पन्न ठरविले जात असे. मंत्री तोरडमलची पध्दत दक्षिणेकडे निजामाचा दिवाण अहमदनगरचा वजीर मलिक अंबर यानेही सन १६०५ते १६२६ या काळात काही सुधारणासह विकसीत केली. त्यांनी जमीन मोजणीच्या वरील पद्धती कायम ठेवल्या. जमीन धारकाचे मालकी हक्क व सत्ता प्रकाराची पद्धत अंमलात आणली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ म्हणजे सन १६७४ पासून जमीन महसूल आकारणीसाठी फ्खेडेङ्ग हे एकक वापरले जात असे. पीक उत्पादन करणाऱ्यांची क्षमता पाहून कर आकारणी (शेतसारा) बसविला जाई. या पद्धतीला फ्क्रमालधाराङ्ग म्हटले जाई. प्रत्येक गावात मामलेदार हे देशमुख, देशपांडे, वतनदार व पाटील यांच्या मदतीने जमीन महसूल गोळा करण्याचे काम करत असत. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात ही पद्धत बंद झाली. याच काळात मामलेदार या पदाचा लिलाव सुरू झाला.

मराठेशाहीमध्ये इनाम, वतन व मिरास हे शब्द जमिनीच्या महसूल आकारणीशी निगडीत होते. याद्वारे जमिनीची मालकी व महसूल आकारणीचे अधिकार देण्यात येत होते. हे अधिकार वंश परंपरागत होते. अशा प्रकारे भारताच्या विविध प्रांतांमध्ये मोजणी व शेतसारा कर वेगवेगळ्या पद्धतीने अंमलात होते.

१८ व्या शतकाच्या शेवटी पुण्याच्या उत्तरेस भीमा नदीपासून तापी नदीकाठच्या बहरानपूर विस्तृत भूप्रदेश प्रथमत: नकाशात बसविला. नकाशामध्ये सातपुडा डोंगररांगा, अजंठा टेकड्या, महत्त्वाची गावे व नद्या सांकेतिक पद्धतीने दाखविल्या आहेत. याच दरम्यान नाशिक शहराचा नकाशा सर्वप्रथम केला गेला आहे.

ब्रिटिशांनी सन १७५७ पर्यंत भारतीय भूभागावर वर्चस्व मिळविले. परंतु ब्रिटिश हे व्यापारी म्हणून भारतात आले होते. त्यांना व्यापारी दृष्टीकोनातुन भारतामधून उत्पन्न हवे होते आणि भारतामध्ये जमीन हे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन होते. म्हणून ब्रिटिशांनी उत्पन्न मिळविण्याकरिता जमिनीची शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षण व कर आकारणी सुरू केली. या दृष्टीकोनातून ब्रिटिशांनी सन १७६७ मध्ये सर्व्हे ऑफ इंडियाची स्थापना केली व या पदावर सर्व्हेअर जनरल ऑफ इंडिया म्हणून जेम्स रनेल यांची नियुक्ती करण्यात आली. जेम्स रनेल लिखीत 'ज्ञाँहुरते अूतेङ्ग या पुस्तकात शंकु साखळीने जमिनीची मापे आणि खगोल शास्त्रीय माहिती याचा एकत्रित आधार घेऊन नकाशे तयार केले असा उल्लेख आहे.

सर लॅम्टन यांनी दक्षिण भारतातील केपकामोरिन येथून १० एप्रिल १८०२ मध्ये त्रिकोणमितीय भूमापनाची सुरुवात केली होती. ही सुरवात मद्रास (चेन्नई) जवळील थॉमस पर्वतापासून केली. भूमापनाच्या कामात सर जॉर्ज एव्हरेस्ट यांनी मोठी मदत केली. सर जॉर्ज एव्हरेस्ट भूमापक प्रमुख व त्रिकोणमितीय भूमापनाचे अधीक्षक होते. १८३० मध्ये त्यांची भूमापन कामाचे अधीक्षक म्हणून नेमणूक झाली. जॉर्ज एव्हरेस्ट यांना 'सर्व्हेअर जनरल बहादूर' असे संबोधले जाऊ लागले. भारतीय भूखंडाचे मोजणीचे काम चालू असताना कर्नल लॅम्टन यांचा मृत्यू झाला. बरेच भूकरमापक मोजणी वेळी शरणागती झाले. त्यांची इतिहासात नोंद नाही. जनता याबाबत अनभिज्ञ आहे. पुढे हे काम जॉर्ज एव्हरेस्ट यांनी ३३ वर्षात पूर्ण केले. अशा प्रकारे भारतीय भूखंडाचे मोजणी काम एकूण ३७ वर्षात पूर्ण झाले.

सन १८१८ मध्ये जेव्हा ब्रिटिशांनी मराठ्यांकडून सत्ता काबीज केली, त्यावेळी दक्षिण विभागाचे राजकारणी कमिशन माउन्ट स्टूअर्ट एल्फिन्स्टन यांनी रयतवारी पद्धतीचा पाया घातला. ब्रिटिशांच्या कारकिर्दीत दुसरी महत्त्वाची गोष्ट करण्यात आली ती म्हणजे शेत जमिनीची शास्त्रशुद्ध पद्धतीने गुंटर नांवाच्या अधिकाऱ्याने अंमलात आणलेल्या शंकू साखळीने मोजणी करण्यात आली. म्हणून शंकू साखळीस गुंटर चैन, गुंठा असे म्हणत. सदर साखळी ३३ फुट लांबीची असून १६ भागांत विभागली आहे. त्या प्रत्येक भागाला आणा म्हणत व गुंटर साहेबांच्या नावावरुन पुढे गुंठा प्रचलित झाला. ४० गुंठ्याच्या जमिनीच्या क्षेत्राला एक एकर म्हणत असे.

जमीन महसूल ठरविण्याचा पहिला मान पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील भिगवण येथून प्रिंगले नावाच्या सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी सन १८२७मध्ये मिळविला.

सध्या अस्तित्त्वात असलेली जमीन महसूल आकारण्याची पद्धत ब्रिटिश राजवटीत ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार आहे. भूमापन पुस्तिका व नगर भूमापन पुस्तिका यामध्ये सविस्तर मोजणी पद्धती दिल्या आहेत.

इंग्रजांच्या काळात शंकू साखळी पद्धतीने मोजणी केली जायची. नंतर प्लेन टेबल मोजणी होत असे. नंतर ए.ऊ.ए ने मोजणी केली जायची, आता रोव्हर या अत्याधुनिक तंत्राद्वारे अक्षांश व रेखांशने मोजणीचे काम केले जाते.

रोव्हरद्वारे मोजणीची वैशिष्टेफायदे रोव्हरद्वारे मोजणी अर्धा तासात होते. मनुष्यबळ कमी लागते, कमी श्रमात मोजणी काम होते. पूर्वी एका हेक्टरसाठी एक दिवस लागत असे. आता अर्ध्या तासात मोजणी होते. अडचणी येत असत. या मोजणीची अचूकता १५ सेंटिमीटरची आहे. अक्षांश, रेखांश कायम स्वरुपी राहणार आहेत. नकाशावरील असल्यास जी. पी. एस. द्वारे मोबाईद्वारे जमिनीच्या मिळकतीची सीमा पाहू शकता. अशा अत्याधुनिक रोव्हर यंत्रणेचा वापर होत असल्याने तत्परतेने मोजणी होते.

– श्री. किरण कांगणे,
नगर भूमापन अधिकारी

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मत घेण्यासाठी एक रुपयात विमा आता मात्र, तुमचं तुम्ही बघा अशी सकारची भूमिका

## विजय वडेट्टीवार यांची भाजपवर टिका


दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** जनतेच्या बोकांडी बसलेल नतभ्रष्ट सरकार आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात असं सरकार पुन्हा होणार नाही. कोणाचीच परवा नसलेल हे सरकार आहे. शेतकरी कर्जाखाली जपलेला आहे. आठ ते दहा शेतकरी आत्महत्या करत आहे. वन थर्ड शेतकरी हे पीक विम्याचे राज्य सरकार भरत होतं. आता पूर्णतः पिक विमा शेतकऱ्याला भरायचा आहे. मत घ्यासाठी एक रुपयात विमा आता मात्र, तुमचं तुम्ही बघा अशी भूमिका सरकार घेत आहे.अशी टिका काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर व सत्ताधाऱ्यांवर केली आहे. यावेळी ते म्हणाले की, भाजपनी कोकाटे यांना केवळ नावालाच मंत्री केलाय. त्यामुळे यांना काम उरलेले नाही, म्हणून ते रमी खेळत आहे. किंवा अधिकार नसल्यामुळे यांना काही करायची इच्छा नसेल कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा अशी अवस्था झाली आहे.चड्डी बनियान लुंगी बनियान वाले. मंत्री गुंडांना सोबत घेणारे आमदार, काय चाललंय महाराष्ट्रात यातून शेतकऱ्यांना तुमचा सरकार नाही तुमचे तुम्ही बघाघ्यावा. मुख्यमंत्र्यांना शेतकऱ्यांबद्दल कणव असेल तर, अशा मंत्र्यांना ते त्या पदावर ठेवावे का हा विचार मुख्यमंत्री करतील.दोघं भावाच काय होते, ते एकदा होऊ द्या. निवडणुका घोषित झाल्यावर आम्ही ठरवू, आम्ही स्थानिक पातळीवर मुंबई महानगरपालिका इतर नगर पालिका संदर्भात स्थानिक नेत्यांना अधिकार दिलेला आहे. हे विधानसभा किंवा लोकसभेची निवडणूक नाही. कार्पोरेशन असे या सगळ्या ठिकाणी स्थानिक नेत्यांना निर्णय घेण्यासाठी सांगितले ते निर्णय घेतील.उद्धव ठाकरे काय म्हणाले ते मला माहित नाही. अलीकडे बैठका महाविकास आघाडीच्याच होत आहेत. महाविकास आघाडी म्हणून आम्ही काम केलेलं आहे. विरोधीपक्ष नेत्यासाठी महाविकास आघाडी म्हणून बैठक घेतल्या आहे. स्थानिक स्वराज संस्था निवडणुका हा विकास आघाडी म्हणून निवडणुका लढतील असे नाही. सगळ्या गोष्टींचा पर्याय आहे. माणूस कोणी पदावर राहिला का किंवा गेला काय त्याचा काही फरक पडत नाही. मोठे काम करणारे अनेक मंडळी झाले. ते पदावरून गेले म्हणून देश पुढे गेला नाही असं होत नाही. ज्यांची त्यांची इच्छा आहे. तो त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. मी संघ आणि भाजपच्या संदर्भात बोलाव हा अधिकार नाही. मोदींनी नव्वद वर्ष ठेवावे की ७५ वर्षे ने काढावे, की शेवटपर्यंत ठेवावे हा त्याचा निर्णय आहे. एकनाथ शिंदे हे



स्वच्छ प्रतिमेचे नेते आहेत. आमचा त्यांच्यावर आरोप नाही, आमचं सरकार पडल त्यापैकी हनी ट्रॅप एक कारण होत.रामदास भाईने अंगावर का घ्यावे, त्यांनी अंगावर घेऊ नये, ज्यावेळी योग्यवेळ येईल, त्यावेळी त्यांना बोलावून दाखवू आता दाखवले तर, वाया जाईल. यात ही वेब सिरीज आहे. टप्प्या टप्याने ते दाखवू, सर्व बाबी आमच्याकडे पोहचल्या आहेत. एक हॉटेलमध्ये अनेक रूम असतात हॉटेल मोठं असतं. याबद्दल भाजपने खुलासा केला आहे. त्यामुळे आम्हाला काही जास्त बोलण्याची गरज नाही. काय काम असेल त्यामुळे भेटले असेल माझ्या माहितीचे हॉटेलमध्ये भेटले नाही वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी गेले होते. एक दुसऱ्यांना भेटले म्हणजे त्या मागे राजनैतिक उद्देश आहे असं होत नाही.शशी तरुण हे काँग्रेसमध्ये काम करत होते. राष्ट्राला सर्वप्रथम मानून ते काम करत होते. आज त्यांचे पावले डगमगत आहे. त्यांची राष्ट्राबद्दल नवीन भावना असेल तर ते प्रकट करत असेल. ज्यांना राष्ट्राचं नाव घेऊन स्वतःच काम करायचं असेल अशी काही लोक आहेत. ते यात बसतात की नाही हे येणारा वेळ सांगेल.असे मतही यावेळी काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## कोकणात जाण्यासाठी गणेशोत्सवानिमित्त २५० विशेष रेल्वे गाड्यांची चाकरमान्यांना भेट



**रत्नागिरी/प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानिमित्त मोठ्या संख्येने मुंबईतील कोकणवासियांनी कोकणात गावी जाण्याची तयारी सुरू केली आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी रेल्वेने गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाण्यासाठी २५० विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

कोकणात २७ ऑगस्ट रोजी गणेशोत्सव सुरू होत आहे. कोकणात जाण्यासाठी मुंबईतील कोकणवासियांची लगबग सुरू आहे. परंतु, एकाच वेळी मोठ्या संख्येने प्रवासी कोकणात जात असल्यामुळे प्रचंड गर्दी होते. त्यामुळे प्रवासादरम्यान असुविधा होते. ही गर्दी विभाजित करण्यासाठी मध्य आणि कोकण रेल्वे मार्गावर २५० विशेष रेल्वेगाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

यामध्ये सीएसएमटी – सावंतवाडी – सीएसएमटी दैनिक विशेष रेल्वेगाडी (४० फेऱ्या) गाडी क्रमांक ०११५१ विशेष रेल्वेगाडी सीएसएमटी येथून २२ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत दररोज रात्री १२.२० वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे त्याच दिवशी दुपारी २.२० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५२ विशेष रेल्वेगाडी सावंतवाडी रोड येथून २२ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या कालावधीत दररोज दुपारी ३.३५ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ४.३५ वाजता पोहोचेल.

सीएसएमटी – रत्नागिरी– सीएसएमटी दैनिक विशेष रेल्वेगाडी (३६ फेऱ्या) असणार आहेत. गाडी क्रमांक ०११५३ विशेष रेल्वेगाडी सीएसएमटी येथून २२ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळी ११.३० वाजता सुटेल आणि रत्नागिरी येथे त्याच दिवशी रात्री ८.१० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५४ विशेष रेल्वेगाडी रत्नागिरी येथून २३ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत दररोज पहाटे ४ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे त्याच दिवशी दुपारी १.३० वाजता पोहोचेल.

सीएसएमटी – सावंतवाडी – सीएसएमटी दैनिक विशेष रेल्वेगाडी (३६ फेऱ्या) असणार आहेत. गाडी क्रमांक ०११०३ विशेष रेल्वेगाडी सीएसएमटी येथून २२ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत दररोज दुपारी ३.३० वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११०४ विशेष रेल्वेगाडी सावंतवाडी रोड येथून २३ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत दररोज पहाटे ४.३५ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे त्याच दिवशी दुपारी ४.४० वाजता पोहोचणार आहे. हे आरक्षण २४ जुलैपासून सुरू होणार आहे. गणपती विशेष गाड्यांचे आरक्षण २४ जुलै रोजीपासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर विशेष शुल्कासह सुरू करण्यात येणार आहे. अनारक्षित डब्यांसाठी तिकीट आरक्षण अनारक्षित तिकीट प्रणालीद्वारे (यूटीएस) अतिजलद मेलएक्सप्रेस गाड्यांसाठी लागू असलेल्या सामान्य शुल्कानुसार करता येईल.

मुंबई, पुण्यावरून जाणाऱ्या एकूण १३८ विशेष रेल्वेगाड्याची सोय करण्यात आली आहे. त्यामध्ये दिवा – चिपळूण मेमूच्या ३८ फेऱ्या धावतील. लोकमान्य टिळक टर्मिनस – सावंतवाडी रोड दैनिक विशेष रेल्वेगाडीच्या ७२ फेऱ्या धावतील. लोकमान्य टिळक टर्मिनस – सावंतवाडी रोड साप्ताहिक विशेष रेल्वेगाडीच्या ६ फेऱ्या धावतील. लोकमान्य टिळक टर्मिनस – मडगाव साप्ताहिक विशेष रेल्वेगाडीच्या ४ फेऱ्या धावतील. लोकमान्य टिळक टर्मिनस – मडगाव वातानुकूलित साप्ताहिक विशेष रेल्वेगाडीच्या ६ फेऱ्या धावतील. पुणे – रत्नागिरी साप्ताहिक विशेष रेल्वेगाडीच्या ६ फेऱ्या धावतील. पुणे – रत्नागिरी वातानुकुलित साप्ताहिक विशेष रेल्वेगाडीच्या ६ फेऱ्या धावणार आहेत.

## उद्धव ठाकरेंची मुलाखत येताच गिरीश महाजनांचा पुन्हा खळबळजनक दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या 'सामना' दैनिकाचे संपादक आणि खासदार संजय राऊत यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मुलाखत घेतली आहे. या मुलाखतीत उद्धव ठाकरे यांनी भाजपसह शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला. आता यावर मुलाखतीवरून भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांनी प्रहार केलाय. तसेच काही दिवसांपासून गिरीश महाजन यांनी शिवसेना जमीनदोस्त करू, असा दावा केला होता. आता उद्धव ठाकरेंची मुलाखत समोर येताच गिरीश महाजन यांनी ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संपर्कात असल्याचा दावा केलाय. गिरीश महाजन यांच्या दाव्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

गिरीश महाजन म्हणाले की, ठाकरे ब्रँड हा बाळासाहेबांच्या सोबतच संपला आहे. सध्या संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांची सुरू असलेली मुलाखत ही जनतेसाठी करमणूक आहे. ठाकरेंची मुलाखत संजय राऊत घेतात हा सगळा मॅनेज शो आहे. ही मुलाखत दुसऱ्या कोणी घेतली असती तर वेगळा भाग होता. मात्र, सध्या सुरू असलेली ही मुलाखत जनतेसाठी मोठी करमणूक असल्याची टीका त्यांनी केली आहे.

ठाकरेंचे खासदार संपर्कात, गिरीश महाजनांचा दावा

गिरीश महाजन पुढे म्हणाले की, पूर्वी तीन ते चार खासदार आमच्याकडे येणार होते. आता ही संख्या अजून वाढली आहे. आता यामध्ये अजून जास्त खासदारांची वाढ झाली असून हे सर्व विरोधी पक्षातील खासदार आहे. यात उद्धव ठाकरे यांच्या खासदारांची संख्या जास्त आहे, असा दावा त्यांनी केला आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात हनी ट्रॅप प्रकरण चांगलेच चर्चेत आले आहे. आजी–माजी अधिकारी आणि काही बडे नेते हनी ट्रॅपमध्ये अडकले असून या हनी ट्रॅपचा सूत्रधार नाशिकचा असल्याची चर्चा रंगली आहे. या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत बोलताना सध्या हनी ट्रॅपी प्रकरणाची चर्चा होतेय. पण ना हनी आहे ना ट्रॅप, असे वक्तव्य केले होते. तर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नाशिकच्या हनी ट्रॅपची सीडी आमच्याकडे असल्याचा दावा केला आहे. मागील काळात जी काही सत्तापालट झाली ती देखील अशाच सीडीमुळे झाली, असेही विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. याबाबत गिरीश महाजनांना विचारले असता शिंदे यांचे सरकार कुठल्या सीडी आणि पेन ड्राईव्हवर आले, अशी हास्यास्पद विधाने विरोधी नेते करीत असून ही सीडी दाखवा. मग सर्व राज्याला खरे काय ते कळेल? असा टोला त्यांनी विजय वडेट्टीवार यांना लगावला आहे.




## संक्षिप्त...


### गणेशमूर्तीकारांच्या वतीने मंत्री आशिष शेलार यांचा सत्कार





दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** गणेशमूर्तीचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या आणि जगप्रसिद्ध गणेशमुर्ती ज्या पेण तालुक्यात बनवल्या जातात. त्या पेण तालुक्यातील हमरापूर येथील गणेश नगरीत आज राज्याचे सांस्कृतिक मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष शेलार यांचे आज रायगड जिल्ह्यातील समस्त गणेश मुर्तीकरांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. पर्यावरणाचा विचार करता पीओपी गणेशमूर्तीवर केंद्र सरकारने बंदी आणली होती. मात्र गणेश मूर्तिकारांची बाजू ठामपणे मांडून पीओपी च्या मूर्तीवर आणलेली बंदी शिथिल केली. यामुळे आज त्यांचा जाहीर सत्कार गणेश मुर्ती काराच्या वतीने करण्यात आला.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या लाडक्या बहिणींनी भरवले विविध वस्तूंचे प्रदर्शन





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपतीसंभाजीनगर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील ३ भागांमध्ये त्यांच्या लाडक्या बहिणींनी भरवले विविध वस्तूंचे प्रदर्शन. परिसरातील नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळत असून, लाडक्या बहिणींना या प्रदर्शनातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजना सुरू करून, अनेक महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. आणि त्याच पैशातून अनेकांनी उद्योग सुरू केले आहेत. त्याचे प्रदर्शन आज एनथ्री भागांमध्ये माजी नगरसेविका माधुरी उदंड यांच्या प्रयत्नातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भरवण्यात आले. यावेळी लाडक्या बहिणींनी रोजगार मिळाल्यचे समाधान व्यक्त केले.

### भाजप आमदार पडळकरांबाबत उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिली मोठी माहिती, म्हणाल्या !

**पुणे/प्रतिनिधी :** 'भारतीय जनता पक्षाचे आमदार गोपीचंद पडळकर यांना मी सभागृहात एक दिवस न बोलण्याची शिक्षा केली होती. त्यानंतर त्यांच्यामध्ये चांगलीच सुधारणा झाली आहे,' असे विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.'राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे कायमच पडळकरांना मंगळसूत्र चोर म्हणून ओरडतात आणि त्यांना चिथावणी देतात,' असेही गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये झालेल्या कामकाजाबाबत माहिती देण्यासाठी डॉ. गोऱ्हे यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्या वेळी विधिमंडळ परिसरात झालेल्या हाणामारीच्या पार्श्वभूमीवर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गोऱ्हे बोलत होत्या.

'हाणामारीची सुरुवात पडळकरांच्या कार्यकर्त्यांकडून झाली का,' असा प्रश्न विचारता, 'त्यांच्यात सभागृहामध्ये सुधारणा झाली, असे मला म्हणायचे आहे. सभागृहाबाहेर काय होते, त्यावर मी बोलत नाही,' असे गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. 'उद्धव ठाकरे व राज ठाकरे एकत्र आले, तरी आमच्यावर त्याचा काहीही परिणाम होणार नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच बाळासाहेब ठाकरे यांचे खरे वारसदार आहेत,' असेही त्या म्हणाल्या.'हिंदी भाषेची सक्ती करणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. ते हिंदीसाठी आग्रही नाहीत. या संदर्भात त्यांच्यावर होणारे आरोप तथ्यहीन आहेत,' असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.मुंबई येथे राज्याचे विधानसभा अधिवेशन सुरू होते. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यात सुरू असलेल्या शाब्दिक चकमकीचे पडसाद उमटले होते. या दोन्ही नेत्यांमध्ये सुरू शाब्दिक चकमकीनंतर दोन्ही आमदारांचे कार्यकर्ते विधानभवनाच्या पायऱ्यांजवळ एकमेकांना भिडले. त्यांच्यामध्ये तुंबळ हाणामारी देखील झाली. या घटनेचे व्हिडिओ सुद्धा सोशल मीडियात व्हायरल झाले.

त्यानंतर या प्रकरणावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुख्य सुरक्षा अधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.

# सर्व गुंड बुलढाण्यात बसलेत की काय असा संशय आहे

## एमआयएम नेते इम्तियाज जलील यांची टिका

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** विधानसभा अतिशय खालच्या स्तरावर गेली आहे.याचे दुर्दैव आहे,सर्व गुड बुलढाण्यात बसलेत की, काय असा संशय आहे.कृषिमंत्री विधानसभेत रमी खेळत असतील तर यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही.अशी टिका एमआयएम नेते इम्तियाज जलील यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, मदरस्यांमध्ये आतंकवादी घडवले जातात,असे वक्तव्य नितेश राणे यांनी केले आहे. सरकार तुमची आहे, मदरसे बंद करून दाखवा, आमच्या प्रमाणे तुमचा पक्ष ही तुमची बावळटमध्ये गिनती करतो का, नितेश राणे यांना आजार झाला आहे. प्रसिद्धीसाठी बडबड करायचे. असं बोलण्यासाठी सरकारकडून



काही पिल्ले सोडली जातात. रोहित पवार यांच्यावर गुन्हा दाखल झाला. मात्र, पडळकर आणि राणेंवर गुन्हा दाखल झाला नाही.सत्ताधारी पक्षातील कोणीही गुन्हा केला तरी त्यावर दुर्लक्ष करा आणि विरोधकांवर गुन्हा दाखल करा असे आदेश पोलिसांना दिले असावेत,असेही ते म्हणाले. मंत्री संजय शिरसाट यांनी शनि शिंगणापूरला जाऊन पूजा केली. मात्र,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा हे संजय शिरसाट मानत आहेत का हे त्यांनी त्यांच्या समाजाला सांगावे, मी भ्रष्टाचाराचा मुद्दा काढल्यानंतर त्यांनी संपूर्ण समाज माझ्या अंगावर सोडला होता. लाडकी बहीण योजना महाराष्ट्राला पडवरणारी नाही, केवळ सत्तेवर येण्यासाठी योजना सुरू केली, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्यानंतर लाडक्या बहिणीचे लाड संपतील आणि योजना बंद होईल. महाराष्ट्रातील मराठी लोकांची इच्छा आहे ठाकरे कुटुंब एकत्र आले पाहिजे. मात्र, हे दोघे भाऊ एकत्र येऊ नये,यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपा प्रयत्न करत आहे.असा आरोप त्यांनी केला. कुरेशी समाजाने जनावरे खरेदी विक्रीवर बहिष्कार टाकला आहे.त्याचे समर्थन करतो, जनावरांची खरेदी विक्री करण्याची परवानगी असलेल्या व्यक्तींना सुद्धा बजरंग दलाचे गुंड गाड्या अडवून मारहाण करत आहेत. त्यामुळे त्यांची सहनशीलता आता संपलेली आहे. विधानसभा अतिशय खालच्या स्तरावर गेली आहे. याचे दुर्दैव आहे, सर्व गुंड तिथे बसलेत की काय असा संशय आहे, त्यांना सरकार अभय देत आहे. भरत गोगावले, संजय शिरसाठ, संजय गायकवाड, आणि आता कृषीमंत्री रमी खेळत आहेत. एक काळ होता आरोप झाल्यानंतर मंत्री नैतिक जबाबदारी म्हणून राजीनामा देत होते. मात्र, सर्व पुरावे दिल्यानंतर चौकशीची गरज नसतानाही कारवाई होत नाही, देशात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात होत आहे. त्यावर उपाययोजना करण्याऐवजी कृषिमंत्री विधानसभेत रमी खेळत असतील तर यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही.असे मत यावेळी एमआयएम नेते इम्तियाज जलील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# सभागृहात हमी नाही तर रमीची चर्चा ; आमदार जितेंद्र आव्हाड यांची मंत्र्यांवर टिका

**ठाणे/प्रतिनिधी :** सभागृहात शेतकऱ्यांना हमीची नाही तर रमीची चर्चा आहे.प्रामाणिकपणे संपूर्ण निट सत्यावर आधारित तपास व्हावा, नितीन ठाकरेंनी चौकशी करावी अशी मागणी आहे. कोणताही राजकीय प्रेशर न ठेवता चौकशी करावी. असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की,पहिले आयओ दिलीप पाटील यांनी कोणतीही कारवाई केली नाही, केस उलट सुलट करून दुर्लक्ष केले. पोलीस प्रेस नोटमध्ये नजीब मुल्ला यांचे नाव असून कारवाई झाली नाही. करप्ट ऑफिसर यांनी न्याय दिला नाही, मनसेकडून कोणताही सपोर्ट नाही. जमील शेख प्रकरण पूर्ण ओपन आहे, यामागे अका आहे, पाचवर्ष त्याला अटक केली नाही. आका आणि ओसामा दोन नावे कॉमन आहेत.- कुटुंबाचे कौतुक, मी कोणतीही मदत केली नाही. आम्हाला पैसा मदत नको द्यायच असेल तर न्याय द्या असे कुटुंब मला म्हणाले. ५ वर्षात पहिल्यांदा विधानसभेत पुराव्यासकट प्रकरण मांडले. एवढी मगरूरी आहे. की ज्याने चौकशी केली त्याची बदली केली आणि ते आका ने स्टेटस ठेवला. कोणत्या मंत्र्यांनी हस्तक्षेप केला सर्व माहिती आहे.पिता म्हणून फडणवीस या केस कडे बघत आहे. त्यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे.



ठाण्यात अडीच हजार कोटीचा जामीन घोटाळा झाला आहे. पॉलिटिकल प्रेशमुळे पोलीस कारवाई करत नाहीत. येऊरमध्ये नंगानाच सुरू आहे. आयुक्त झोपलेत का? आंधळे आहेत का?असा प्रश्न जितेंद्र आव्हाड यांनी केला.

सभागृहाचे पवित्र्य ठेवले जात नाही, सत्तेच मगरुरी आहे. विधिमंडळ एकाला पाच जन मारतात. पोलीस फक्त एकाला अटक करतात. मी परिसरात नव्हतो, सर्व बिल माझ्यावर फाडले असते. महाराष्ट्राची द्रौपदी झाली आहे, सभागृहात हमी नाही तर रमीची चर्चा आहे.माझी चूक असेल तर गेट वे मध्ये जाऊन महाराजांची माफी मागेल. शरद पवार, उद्धव ठाकरें, जयंत पाटील यांच्याबद्दल कुटुंबाबदल बोलल्यावर वारिष्ठ यांनी अडवायला हवे होते. माझ्या कार्यकर्त्यांवर अन्याय होत असेल तर जीवाची बाजू लाऊ, कार्यकर्त्यांसाठी लढू, असेही आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले.

# बेशिस्त वाहतूकीला शिस्त लावणार कोण?



**उमरखेड/प्रतिनिधी :** उमरखेड मध्ये होत असलेल्या वाहतूक कोंडीला कोण आवर घालणार? मेन चौकात चार चाकी व दोन चाकी गाड्या बेसिस्त पणे उभे करून वाहतूक कोंडी करत असताना वाहतूक पोलीस करते काय? उमरखेड नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे पडत आहे प्रश्न ? वाहतूक कोंडी साठी उमरखेड मध्ये वाहतूक पोलीस कार्यालय असून सुद्धा उमरखेड मध्ये नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावे लागत आहे हे नवलच! नागरिक वाहतूक पोलीस यांच्यावर संताप व्यकत करत आहे की,वाहतूक पोलीस प्रशासन फक्त बाजार पेठ च्या दिवशी गावा बाहेर थांबून वसुली करण्याकारिता आहे का? शहरातील वाहतूक कोंडी होत असताना एक ही वाहतूक पोलीस तिथे दिसत नसल्याने उमरखेडचे वाहतूक पोलीस कार्यालय फक्त हप्ता वसुली करण्यासाठी आहे का ? या प्रश्नाचे नागरिक जाब विचारत असून वरिष्ठअधिकारी यांनी याकडे लक्ष देऊन समस्या मार्गी लावण्याची मागणी जोर धरत आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात जनावरे खरेदी विक्रीवर मुस्लिम खाटीक बांधवांचा बहिष्कार; शेतकऱ्यांच्या अडचणी वाढणार





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मुस्लिम कुरेशी खाटीक बांधवांनी जनावरांच्या कायदेशीर व्यापारात होणा-या त्रासाला कंटाळून जनावरे खरेदी विक्री करण्यास राज्यात बेमुदत बंदीची घोषणा केली आहे. टप्प्या टप्प्यात याची अंमलबजावणी होत असून बुलढाणा जिल्ह्यात देखील मुस्लिम खाटीक बांधव एकवटले आहे. आज पासून जिल्ह्यात बाजारातून जनावरांची खरेदी-विक्री करणार नाही अशी घोषणा बुलडाणा येथील जोहर नगर येथे आयोजित बैठकीत घेण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकरी बांधवांच्या अडचणी निश्चित वाढणार आहे. मुस्लिम खाटीक बांधव मोठ्या प्रमाणात जनावरे खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात.अधिकृत बाजारातून ते शेतकरी व इतर व्यापाऱ्यांकडून मोठी जनावरे खरेदी करतात आणि हीच जनावरे गाडीत टाकून निघतात तेव्हा गौरक्षेच्या नावाखाली बजरंग दल व इतर हिंदुत्ववादी संघटनांचे तथाकथित कार्यकर्ते गाडी अडवून चालक,क्लिनर व व्यापाऱ्यांना अमानुषपणे मारहाण करतात व जनावरे खरेदीचे कागदपत्रे असतांना देखील पोलीस त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करतात. अश्या घटना वाढत असतांना हा अन्याय का सहन करावा,असा प्रश्न उपस्थित करत मुस्लिम खाटीक बांधवानी जनावरे खरेदी विक्रीवर पूर्णपणे बहिष्कार टाकला असून आज पासून बुलढाणा जिल्ह्यात देखील या निर्णयावर अंमलबजावणी केली जाणार आहे. शासनाने याकडे लक्ष देऊन भविष्यात शेतकरी बांधवांची अडचण समजून योग्य ते निर्णय घ्यावा अशी मागणी देखील मुस्लिम खाटीक बांधवांनी केली आहे.

## भाजप नेते प्रविण दरेकर अडकल लिफ्टमध्ये, कार्यकर्त्यांनी दरवाजा तोडून केली सुटका, लिफ्टची क्षमता १० जणांची पण चढले १७ जण

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधान परिषदेतील भाजपचे गटनेते आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रविण दरेकर हे आज वसईत तब्बल १० मिनिटे लिफ्टमध्ये अडकले. वसई पश्चिमेतील कौल हेरिटेज सिटी येथील अपुलँड ग्रँड बॅन्क्वेट हॉलमध्ये जुन्या आणि जीर्ण इमारतींच्या स्वयंपुनर्विकासासाठी आयोजित मार्गदर्शन शिबिरासाठी दरेकर आले होते. या शिबिरासाठी आलेल्या अनेक मान्यवरांमध्ये दरेकर यांच्यासोबत वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडीत आणि नालासोपाऱ्याचे आमदार राजन नाईक हे देखील लिफ्टमध्ये होते. दरम्यान, दरेकड लिफ्टमध्ये अडकल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी दरवाजा फोडून दरेकरांची सुटका केली.

मिळालेल्या माहितीनुसार, लिफ्टची क्षमता केवळ १० जणांची असूनही त्यामध्ये १७ जण चढल्यामुळे तांत्रिक बिघाड होऊन लिफ्ट अचानक बंद पडली. परिणामी लिफ्टमध्ये अडकलेले सर्वजण चिंताग्रस्त झाले. पण अखेर १० मिनीटांनतर सर्वांची सुटका झाली आहे. घटनेनंतर कार्यकर्ते आणि सुरक्षारक्षकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. लोंखंडी रॉडच्या साहाय्याने लिफ्टचा दरवाजा उघडण्यात आला. लिफ्टमध्ये अडकलेल्या सर्वांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. सुरक्षितपणे लिफ्टमधून बाहेर आल्यानंतर प्रविण दरेकर आणि राजन नाईक यांनी पाणी पिऊन विश्रांती घेतली. या घटनेमुळे कार्यक्रमातही काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती,

# मनसेकडून पुरग्रस्त शेतकऱ्यांना बियाणे वाटप

दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी :** दारव्हा तालुक्यातील अंतरगाव परिसरात पावसामुळे नाल्याला आलेल्या पुराने शेतात पाणी शिरल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले होते.

शेतकऱ्यांची ही व्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष लाला पांडे यांना समजताच त्यांनी जिल्हाध्यक्ष देवाभाऊ शिवरामवार आणि मनसे नेते अनिल हमदापुरे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची



माहिती दिली. या माहितीची दखल घेत मनसेच्या वतीने तात्काळ शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी लागणारे मोफत बियाणे उपलब्ध करून देण्यात आले.

या उपक्रमांतर्गत गेली अनेक वर्षे मनसेतर्फे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप केले जात आहे. यंदाही ही परंपरा कायम ठेवत पुरग्रस्त शेतकऱ्यांना वेळेवर मदत पोहोचविण्यात आली. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक भार हलका झाला असून त्यांनी मनसेचे आभार मानले.

बियाणे वाटपाच्या प्रसंगी मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब कठाळे, रणजित झोंबाडे, ईश्वर राठोड, राम गायकवाड, नागोराव चव्हाण, रणजित चव्हाण, शैलेश घाटे, राजू वांडूसवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### गोत्रा येथील जिल्हा परिषद शाळेत १ हजार झेंडुच्या रोपांची लागवड; वृक्षमित्र मयूर चव्हाणचा स्तुत्य उपक्रम






दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी :** तालुक्यातील गोत्रा येथील जिल्हा परिषद शाळेत वृक्षमित्र म्हणून सर्वदूर परिचित असलेले मयूर चव्हाण यांनी जिल्ह्यातील पहिली फळबाग तयार केली होती. त्यात अजून भर म्हणून त्यांनी स्व खर्चातून १ हजार झेंडुच्या रोपांची लागवड केली आहे. लागवड केलेल्या झेंडुंना दिवाळीला फुल येणार आहेत. सदर उपक्रमाबाबत अधिक माहिती देताना मयूर चव्हाण यांनी सांगितले की, या एक हजार झेंडुच्या रोपांच्या माध्यमातून जे काही उत्पन्न निघेल त्यात एक रुपया सुध्दा माझा नसेल, या झेंडूपासून एक रुपया जरी मिळाला तरी तो एक रुपया सुद्धा शाळेतील लेकरासाठी खर्च होणार असल्याची माहिती मयूर चव्हाण यांनी दिली आहे. मिळणारी रक्कम ही गरीब होतकरू मुलांसाठी खच्च करण्याचा उद्देश आहे. लोणार पंचायत समितीचे माजी गटशिक्षणाधिकारी राठोड तसेच लोणार पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी कुंभारे,टिटवी केंद्राचे केंद्रप्रमुख सानप यांचे मयूर चव्हाणला वेळोवेळी मार्गदर्शन मिळत आहे. बुलढाणा जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी खरात यांनी देखील त्यांच्या कार्याचे वेळोवेळी कौतुक केले आहे, अश्या या अवलिया वृक्ष मित्राचे लोणार पंचायत समिती व सर्वदूर कौतुक होत आहे.मयूर चव्हाण यांचे नवनवीन उपक्रम निश्चितच इतरांना प्रेरणादायी ठरत आहेत.

### मनसे दारव्हा शहराध्यक्षपदी राम गायकवाड यांची नियुक्ती

दैनिक आपला विदर्भ

**दारव्हा/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लक्षात घेता महाराष्ट्र नवनिर्माण



सेनेतर्फे तालुक्यात पक्ष प्रवेश व पदाधिकारी निवड प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर दारव्हा येथील विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाध्यक्ष देवाभाऊ शिवरामवार यांच्या अध्यक्षतेखाली राम गायकवाड यांची मनसे दारव्हा शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. राम गायकवाड हे सामाजिक कार्यकर्ते असून, शहरात त्यांचे चांगले जनसंपर्क आहे. त्यांच्या निवडीने पक्षाला स्थानिक पातळीवर अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल हमदापुरे, तालुकाध्यक्ष बाळासाहेब कठाळे, लाला पांडे, रणजित झोंबाडे, ईश्वर राठोड, शैलेश घाटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### पोलादपूर बाजारपेठेतील घरफोडीच्या तपासादरम्यान आरोपींकडून दोन मोटारसायकलीही हस्तगत

**पोलादपूर/प्रतिनिधी :** शहरातील बाजारपेठमध्ये असलेल्या दुकानाचे लोखंडी शटर उचकटून ६९०० रुपयांची रक्कम चोरणाऱ्या घरफोडीच्या आरोपीचा तपास करताना त्याच्याकडून दोन मोटरसायकली देखील ३ हजार रुपये रोख रक्कमेसह हस्तगत करण्यात आल्या. घरफोडीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर केवळ २४ तासात आरोपीला ताब्यात घेण्यात पोलादपूर पोलिसांना यश आले आहे. पोलादपूर शहरातील बाजारपेठमध्ये असलेल्या आशीर्वाद जनरल स्टोअर्स मध्ये १३ जुलै रोजी रात्री अज्ञात इसमाने दुकानातील लोखंडी शटर उचकटून एकूण ६९०० रुपयांच्या नोटा चोरल्या. या घटनेची फिर्याद दुकानदार अजय गांधी यांनी १७ जुलै रोजी पोलादपूर पोलीस ठाण्यात दिली.